# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियत, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

**(वित्त व लेखा अधिकारी यांचे कार्यालय)**

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

**सि.ए.मुकूंद भांबेरे**
**वित्त व लेखा अधिकारी**
**भ्रमणध्वनी क्र. : ९४०४८२५७३८**

**संकेतस्थळ : www.unigug.ac.in**
**ई.मेल : faogug@gmail.com**
**दुरध्वनी क्र. : ०७१३२-२२३१०६**

जा.क्र. /गो.वि./वि.ले.वि./९४४२/२०२०

दिनांक - ०९/११/२०२०

## दरपत्रक सुचना क्र. १६

**विषय- उपकरण/साहित्यांवर नंबरींग करण्यासाठी स्थानिक पेंटरसह वार्षीक दरकरार करण्याबाबत.**

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली व्दारे भांडार विभाग तसेच विविध विभागाअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या उपकरण/साहित्यांवर नंबरींग करण्याकरीता वार्षीक दरकरार करण्यासाठी गडचिरोली स्थित/ लगतचे स्थानिक पेंटर यांचेकडून खालील अटि व शर्तींच्या अधीन राहून सोबत जोडलेल्या **"प्रपत्र-अ"** मध्ये दर मागविण्यात येत आहेत.

इच्छुक पेंटर यांनी त्यांचे दर भरून दरपत्रकाचा सिलबंद लिफाफा **दि. /११/२०२०** रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत वित्त व लेखा अधिकारी यांचे नावे आवक जावक विभाग गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे सादर करावा. मुदतीनंतर प्राप्त होणारे दरपत्रक विचारात घेतले जाणार नाहीत. दरपत्रके स्विकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार विद्यापीठ प्रशासनाने राखुन ठेवलेला आहे.

**<u>अटि व शर्ती :</u>**

१) सोबत जोडलेल्या **"प्रपत्र-अ"** मध्ये दर "प्रती नोंद करीता" भरून सादर करावे. (उदा. नोंद/नंबरींगचा नमुणा पुढील प्रमाणे राहिल-(**GUG/FAO/STORE/DSR 05,20/13-2020**)

२) उदाहरनार्थ दर्शविल्याप्रमाणे नोंदी/नंबरींग करण्याकरीता वार्षीक दरकरार करण्यासाठी दर मागविण्यात येत असून निवीदाकाराने दर सर्व कर समावेशक सादर करावे.

३) विद्यापीठाने आदेशीत केल्यानुसार नंबरींग करून देणे बंधनकारक आहे. उदाहरणामध्ये दर्शविलेल्या शब्दांपेक्षा कमी-अधिक शब्दांचा/संख्येचा वापर नंबरींगमध्ये होवू शकतो. तथापी विद्यापीठाने मंजूर केलेले दर (प्रती नोंद प्रमाणेच) देय राहतील.

४) नोंद घेण्याकरीता पेंटरला स्वतःचे ब्रश व पेंट वापरावयाचे आहे. विद्यापीठ कोणतेही साहित्य / मनुष्यबळ पेंटरला पुरविणार नाही.

५) विद्यापीठाने पत्रान्वये/दुरध्वनीवरून आदेशीत केल्यानुसार विद्यापीठामध्ये स्वखर्चाने उपस्थित राहून नंबरींग करुन द्यावे लागेल.

६) मंजुर झालेल्या दराचा कालावधी हा एक वर्षाचा राहिल. मंजुर दरानेच वर्षभर कार्य करणे बंधनकारक राहिल.

७) दर सर्व करासहित असावेत, अटिबद्ध असलेले दर स्विकारले जाणार नाही. दर अचुक सुस्पष्ट असावेत.

८) दरपत्रकाच्या बंद लिफाफ्यावर **"साहित्यांवर नंबरींग करण्याकरीता वार्षीक दरकरार करण्याबाबत निवीदा"** असे शिर्ष स्पष्ट नमूद करावे.

९) वित्त व लेखा अधिकारी, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचे नावे दरपत्रक सादर करावे.

१०) गोंडवाना विद्यापीठ प्रशासनाने निवीदा मान्य किंवा रद्द करण्याचा अधिकार स्वतःकडे राखुन ठेवलेला आहे.

११) दरकरार करण्यात येणाऱ्या धारकाकडून होणाऱ्या कार्याच्या देयकाचे शोधन हे त्रैमासीक कालावधीने करण्यात येईल.

१२) आदेशीत केल्यानुसार विहीत मुदतीत पेंटींगची कामे करुन न दिल्यास शासन खरेदी नियमपुस्तिकेनुसार दंड आकारुन दंडाची रक्कम देयकातून कपात केली जाईल.

१३) देयकातून शासन नियमाप्रमाणे टिडीएस कराची रक्कम कपात करुन देयक रक्कम अदा करण्यात येईल.

(सि.ए.मुकूंद भांबेरे)
**वित्त व लेखा अधिकारी**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**